## एकात्मिक शेती पद्धती अंतर्गत
# रेशीम उद्योग
(प्रकल्प उपक्रम सांकेतांक-A2.5.3)

## प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

रेशीम उद्योग हा कृषी व वन संपत्तीवर आधारीत उद्योग असुन यामध्ये रोजगाराची मोठी क्षमता आहे. प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या क्षेत्रामध्ये या उद्योगास पोषक वातावरण असल्याने रेशीम उत्पादन करण्यास भरपूर वाव आहे. कृषी विकास दरवृद्धी बरोबरच ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत करणारा हा उद्योग आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून रेशीम उद्योगास प्रोत्साहन देण्यात येत असूनही राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात या उद्योगाकडे वळलेले दिसून येत नाहीत. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसार करणेसाठी या घटकाचा समावेश नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे.

## उद्दिष्टे:

१. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावसमूहातील शेतक-यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करून उत्पन्नात वाढ करणे.
२. रेशीम उद्योगाचा समुह आधारीत सर्वांगीण विकास करणे.
३. तुती उत्पादन व रेशीम उद्योगात महिलांचा सहभाग वाढविणे.
४. नाविन्यपूर्ण रेशीम तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवणे.
५. रेशीम योजनेची फलश्रुती व यशस्वीता याबाबत व्यापक प्रसिद्धी देवून शेतकऱ्यांना या उद्योगासाठी प्रोत्साहित करणे.

## लाभार्थी निवडीचे निकष :

१. इच्छुक लाभार्थ्याकडे मध्यम ते भारी व पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी.
२. लागवड केलेल्या तुती क्षेत्रासाठी सिंचनाची पुरेशी सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.
३. रेशीम उद्योगासाठी कुटुंबामध्ये किमान एक व्यक्ती तुती लागवड व संगोपनासाठी उपलब्ध असलेले अनु. जाती/ अनु. जमाती/ महिला/ दिव्यांग व इतर शेतकरी या घटकासाठी पात्र आहेत.

## अर्थसहाय्य:

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या घटकासाठी दिलेल्या मापदंडानुसार सामान्य प्रवर्गातील लाभार्थींना ७५% व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती करिता ९०% अर्थसहाय्य देय आहे.

| अ. क्र. | तपशील | एकक | मंजूर मापदंडानुसार खर्च (Unit cost) | प्रकल्प अर्थ सहाय्याचे प्रमाण (मंजूर मापदंडानुसार) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण (७५ %) | अ.जाती / अ. जमाती (९०%) |
| १. | तुती रोपे तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य | प्रति एकर | १,५०,०००/- | १,१२,५००/- | १,३५,०००/- |
| २. | तुती लागवड विकास कार्यक्रमांकरिता सहाय्य | प्रति एकर | ५०,०००/- | ३७,५००/- | ४५,०००/- |
| ३. | दर्जेदार कोष उत्पादनासाठी - किटकसंगोपन साहित्य/ शेती अवजारे साहित्य पुरवठा सहाय्य आधुनिक मांउटेज (Rotary Mountages) सहित | प्रति लाभार्थी | ७५,०००/- | ५६,२५०/- | ६७,५००/- |
| ४. | किटकसंगोपन गृह बांधणी साठी सहाय्य प्रती लाभार्थी | मॉडेल I (१००० चौ. फूट) | १,६८,६३९/- | १,२६,४७९/- | १,५१,७७५/- |
| | | मॉडेल II (६०० चौ. फूट) | ९५,१९७/- | ७१,३९७/- | ८५,६७७/- |

**संदर्भ :-** १. केंद्र शासनाची सिल्क समग्र कार्यान्वयन मार्गदर्शक सूचना २०१७-२०२०; नं. सीएसबी. ३७ / २ / ईएफसी /सीएसएस /२०१७-२०/सी एस एस दिनांक १९/०७/२०१८.

२. सिल्क समग्र Integrated Scheme for Development of Sericulture Industry (ISDSI) योजना-२०१८-२०; जाहिरात/रेशीम संचालनालय, नागपूर/वेबसाईट-www.mahasilk.maharashtra.gov.in

याव्यतिरिक्त बाल्य किटकांच्या बागेची देखभालीसाठी मदत करणे, बाल किटकसंगोपन साहित्य उपलब्ध करणेसाठी मदत करणे ( Chawki rearing centre), मल्टीएंड रिलिंग मशिन (१० बेसिन) उभारणी, ॲटोमॅटिक रिलिंग मशिन (ARM) २०० एन्डस, रेशीम धाग्याला पीळ देणारे यंत्र (४८० एन्डस) उभारणी, मास्टर रिलर्स आणि तंत्रज्ञ यांची सेवा पुरविणे इ. घटकांचा शेतकरी उत्पादक कंपनी/गटांना लाभ देता येईल.

तुती लागवड, इतर साहित्य याबाबतचे तांत्रिक व आर्थिक मापदंड रेशीम संचालनालयाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे असून त्यामध्ये झालेले बदल प्रकल्पासाठी लागू राहतील.

## अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

### लाभार्थी

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज व हमीपत्र (प्रपत्र-१) ग्राम कृषि संजीवनी समितीकडे सादर करावा.

२. पूर्वसंमती मिळाल्यापासून तुती लागवड, प्रकल्प उभारणी पूर्ण करून ६० दिवसात विहित नमुन्यात अनुदान मागणी करावी.
३. निवडलेल्या लाभार्थीने ग्राम स्तरावर गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत रेशीम उद्योग साहित्य खरेदी करावी.
४. रेशीम उद्योगासाठी आवश्यक साहित्य खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थीने करावा.
५. रेशीम उद्योग या घटकांतर्गत अनुदान मिळणेसाठी मागणी पत्र (प्रपत्र-५) संबंधित कृषि सहाय्यकामार्फत उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या नावे सादर करावे. सोबत खरेदी देयकांच्या मूळप्रती व खरेदी समितीचे प्रमाणपत्र (प्रपत्र-४) लाभार्थ्याने स्व:साक्षांकीत करुन सादर करावात.
६. लाभार्थ्याने सदर व्यवसाय किमान ३ वर्षे करणे आवश्यक आहे.

**ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC)**

१. सर्व इच्छुक लाभार्थ्यांचे अर्ज व हमीपत्र (प्रपत्र-१) प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी करून अर्जाच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
२. रेशीम उद्योग साहित्य खरेदी समिती नियुक्त करून तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
३. सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**रेशीम उद्योगासाठी आवश्यक साहित्य खरेदी समिती :-**

१. सरपंच - अध्यक्ष
२. उपसरपंच - सदस्य
३. ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) सदस्यांपैकी एक महिला सदस्य - सदस्य
४. कृषि मित्र / कृषि ताई - सदस्य
५. रेशीम संचालनालयाचा तालुका स्तरावरील प्रतिनिधी
६. कृषि सहाय्यक - सचिव

(अनुक्रमांक १, २, ३ पैकी किमान १ सदस्य, कृषि मित्र / कृषि ताई, रेशीम संचालनालयाचा तालुका स्तरावरील प्रतिनिधी, कृषि सहाय्यक व लाभार्थी यांची खरेदीच्या वेळी उपस्थिती अनिवार्य)

**खरेदी समितीच्या कार्य व जबाबदाऱ्या :-**

१. खरेदी समितीने रेशीम उद्योग साहित्य खरेदी कोठून व कोणत्या प्रकारे/ पद्धतीने करावयाची आहे याबाबत निर्णय उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार घ्यावा.
२. गावातील निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांची रेशीम उद्योग साहित्य खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.
३. लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष रेशीम उद्योग साहित्य खरेदी केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र रेशीम उद्योग साहित्य खरेदी समितीच्या सचिवांनी सादर करावे. (प्रपत्र-४)

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी यांना अर्ज व प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. इच्छुक लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे कृषि सहाय्यक यांचे मदतीने छानणी करून निकषानुसार लाभार्थीची निश्चिती करावी.
३. पूर्वसंमती देते वेळी लाभार्थ्यांकडून विहीत नमून्यात अर्ज व हमीपत्र (प्रपत्र-१) भरुन घ्यावे.
४. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून निर्गमित पूर्वसंमती पत्रांच्या नोंदी घेणे. लाभार्थ्यांस रेशीम उद्योग या घटकाच्या अटी, शर्ती व अंमलबजावणी बाबत समजावून सांगावे.
५. संबंधित कृषि सहाय्यक यांना तुती लागवड, रेशीम उद्योग साहित्य खरेदी व खरेदी पश्चात अंतिम तपासणीसाठी मदत करणे
६. लाभार्थी शेतकरी व तपासणी अधिकारी यांचे अंमलबजावणी पूर्वी व अंमलबजावणी नंतर तुती लागवड केलेल्या शेताचा नैऋत्य कोपऱ्यावरून व खरेदी केलेल्या रेशीम उद्योग साहित्य प्रकल्प स्थळाचे अक्षांश/रेखांशसह फोटो काढावेत. सदरचे फोटो प्रकल्पाच्या संगणक प्रणालीवर अपलोड करावेत.

**कृषि सहाय्यक**

१. लाभार्थीने अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि संजीवनीने (VCRMC) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छानणी आधारे पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन प्रकल्प स्थळ रेशीम लागवडीसाठी/ उद्योगासाठी योग्य आहे किंवा नाही, याबाबत अहवाल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-२) उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. यापूर्वी याच घटकासाठी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.
३. पात्र सर्व अर्ज व कागदपत्रे, स्थळ तपासणी अहवालासहीत उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावीत.
४. तुती लागवडीबाबतचे अंदाजपत्रक रेशीम संचालनालयाच्या मापदंड व मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करणे.
५. तुती लागवडीनंतर मापन पुस्तिकेत नोंदी घेणे.
६. खरेदी करण्यात आलेले रेशीम उद्योग साहित्य मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे घटकनिहाय योग्य असल्याबाबत व खरेदी प्रक्रिया योग्य असलेबाबत मोका तपासणी अहवाल (प्रपत्र-६) अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली नाव नमूद करावे. तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी यादृच्छिक (Random) पद्धतीने १०% लाभार्थ्यांची तपासणी करावी व याबाबतच्या नोंदी व मापनपुस्तिकेची खात्री करून प्रमाणित कराव्यात. सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात (प्रपत्र-७) तपासणी अहवाल

तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांची छाननी नंतर पात्र/ अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबंधित लाभार्थ्यांना पूर्वसंमती (प्रपत्र-३) प्रदान करावी. त्याची एक प्रत ग्राम कृषि संजीवनी समितीस (VCRMC) द्यावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
२. प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या रेशीम उद्योग लाभार्थ्यांच्या मागणीनुसार तुती लागवडीकरिता आवश्यक रोपांचा पुरवठा करण्याचे नियोजन व कार्यवाही करावी.
३. अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प सहाय्यक (कृषि पर्यवेक्षक) उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून देय अनुदान अदायगीसाठी योग्य असलेबाबत खात्री करावी.
४. तपासणी अहवालासह शिफारस झालेल्या पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी प्रस्ताव प्राप्त झाल्या पासून १० दिवसात (निधी उपलब्धतेनुसार) DBT द्वारे थेट लाभार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यामध्ये करावी.
५. लाभार्थी/ ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) / कृषि सहाय्यक / समूह सहाय्यक यांना अवगत केल्यानंतर याद्दच्छिक (Random) पद्धतीने ५% लाभार्थ्यांची तपासणी करावी. (प्रपत्र-७)
६. निवडलेल्या लाभार्थ्यांसाठी रेशीम उद्योग संचालनालयातील अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे. तसेच शेतकऱ्यांचे लागवडपूर्व व लागवडीनंतर रेशीम किडी संगोपनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. हे प्रशिक्षण जुन्या शेतकऱ्याच्या शेतावर, कृषी विज्ञान केंद्र अथवा पंजीकृत व अधिकृत रेशीम संचालनालयाची मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्था अथवा शेतीशाळा, कृषी विद्यापीठ यांचेकडे उपविभागीय कृषि अधिकारी यांनी आयोजित करावे.
७. योजनेचे संनियंत्रण करणे.

**प्रकल्प संचालक, आत्मा**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची याद्दच्छिक (Random) पद्धतीने किमान १% लाभार्थ्यांची तपासणी करावी. तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडलेला आहे. (प्रपत्र-७)
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांची मागणी व आवश्यकतेनुसार निधी उपलब्धतेबाबत संनियत्रण करणे.

## योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल.
२. या घटकास प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
३. तुती रोपांना सिंचना करिता नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन या घटकांतर्गत ठिबकसिंचन या बाबीचा लाभ देय आहे.
४. तुती रोपाकरिता शासकीय रेशीम फार्म, कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे, शासकीय रोपवाटीका, सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीका इ. ठिकाणी रेशीम संचालनालयामधील जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या मदतीने तुती रोपे उपलब्धतेबाबत नियोजन करण्यात यावे. तसेच निवड झालेल्या लाभार्थ्यांना दर्जेदार रोपांची निर्मिती स्वतःच्या क्षेत्रावर तयार करण्याची मुभा देण्यात यावी.
५. तुती लागवडीचा कालावधी जून ते ऑक्टोबर अखेर पर्यंत राहील. या कालावधीत निश्चित केलेल्या क्षेत्रावर तुती लागवड होईल याची सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी.
६. समूह स्वरुपात लागवड होईल अशा प्रकारे नियोजन करावे.
७. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी गावसमूहातील गावसमूह सहाय्यक/संबधित कृषि सहाय्यक यांनी करून अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास या त्रुटींची संबंधित शेतकऱ्याकडून लगेच पूर्तता करून घ्यावी.

# प्रपत्र-१

## प्रकल्पांतर्गत लाभासाठी निवड होणेकरिता अर्ज व हमीपत्र

## जागतिक बँक अर्थसहाय्यित

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

**प्रति,**

**मा. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती .......................... (अर्जदाराचे गाव) .................................**

**गावसमूह क्रमांक...................................तालुका ................................ जिल्हा ................................**

**महोदय,**

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी, माझ्या मालकीहक्काचे शेत जमिनीमध्ये हवामान बदलास पुरक पध्दतीने शेती करण्यासाठी गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता या प्रकल्पांतर्गत खालील घटकाचा लाभ मिळावा, ही विनंती.

**मागणी केलेल्या घटकाचे नाव-............................................................**

**घटकाचा तपशील[१].-.....................................................................**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | अर्जदार शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव | (आडनाव) (प्रथम नाव ) (वडीलाचे नाव )<br>....................... .............................. .......................... |
| २. | पूर्ण पत्ता | घर क्र. ............... गल्ली क्र./भागाचे नाव .....................<br>गाव.............................. पोस्ट..................................<br>तालुका........................... जिल्हा.............................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक-[२] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४. | स्त्री/पुरुष(लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्त्री ☐ पुरुष ☐ |
| ५. | जात प्रवर्ग (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | अ.जा. ☐ अ.ज. ☐ इतर ☐ |
| ६. | अर्जदार दिव्यांग आहे काय?( लागू तेथे √ खूण करावी) | होय ☐ नाही ☐ |
| ७. | दारिद्रय रेषेखालील असल्यास - यादीतील अ.क्र[३]. | ☐☐☐☐☐☐☐☐ |

---

[१] या मध्ये अनुदान मागणी केलेल्या घटकाचा तपशील उदा. शेततळ्याचा आकार, हरितगृहाचा/शेडनेटचा आकार, फळबाग लागवड असल्यास फळपिक नाव, क्षेत्र इ. तसेच ठिबक, तुषार असल्यास- पिकाचे नाव-क्षेत्र इ. तपशील नमूद करावा.

[२] प्रकल्पाच्या विविध घटकातील माहितीची देवाण-घेवाणीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकाचा प्रकल्पाच्या कामकाजासाठी वापर करण्यास माझी सहमती आहे.

[३]दारिद्र्य रेषेखालील दाखला सोबत जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि ग्राम कृषी संजीवनी समिती लाभार्थी निवड करतेवेळी अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबत खात्री करून अर्जाबाबत उचित निर्णय घेऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| ८. | आधारकार्ड क्र.[४] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. | स्वत:च्या नावावरील एकूण क्षेत्र (८-अ प्रमाणे) | खाते क्र............................<br>एकूण जमिनधारणा ☐ (हेक्टर) ☐ (आर) |
| १०. | आरटीजीएस सुविधा असणाऱ्या बँकेचे नाव | |
| | खाते क्रमांक- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| | बँकेची शाखा- | |
| | आयएफएससी कोड- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११. | घेत असलेली पिके- | |
| १२. | ज्या क्षेत्रावर घटक राबविणार आहे त्या क्षेत्राचा सर्व्हे/गट क्रमांक- | क्षेत्र \| गाव \| तालुका |
| १३. | यापूर्वी याच घटकाचा लाभ आपण अथवा आपल्या कुटुंबातील[५] अन्य सदस्यांनी या किंवा इतर योजनेतून घेतला आहे काय? असल्यास लाभ घेतलेली योजना,अनुदान रक्कम व लाभ घेतलेचे वर्षे इ.तपशील . | |
| १४. | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च. | रक्कम रुपये.............................. |
| १५. | निकषानुसार अपेक्षित अनुदान | रक्कम रुपये.............................. |
| १६. | अनुदान वजा जाता उर्वरित रक्कम कशा प्रकारे उभारणी करणार ? (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | स्वत: ☐ बँक कर्जाव्दारे ☐ |

सदर घटकासाठी माझी निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच प्रकल्प आधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण करीन व त्यानंतरच मला अनुदान देय राहील तसेच .सदरचे काम मी विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

सदर बाबीचा लाभ घेत असताना वा त्यानंतर माझेकडुन गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा माझ्याकडुन गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान माझ्याकडून सव्याज वसुल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना घटक तपासणीसाठी माझी संमती आहे तसेच, त्यांना या तपासणी कामासाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ:- (गावाचे नाव).............................

दिनांक- / / २०-- **अर्जदार शेतक-याची सही/अंगठा**

---

कोठेही जतन अथवा सामाईकीकरण )share) केली जाणार नसून ती फक्त सी आय डी आर (Central Identities Data Repository) कडे पडताळणी करता सादर केली जाईल.

कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश राहील.

## प्रपत्र - २

(प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय)

श्री/ श्रीमती------------------------------------------------------- यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत -------------------------------- घटकासाठी अर्ज केलेला आहे. यापूर्वी सदर घटकाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे/ नाही. सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. सदर लाभार्थी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रकल्प स्थळाची पाहणी केली असता रेशीम उद्योग हा घटक राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. सदर लाभार्थ्यास---------- हे. तुती लागवडीसाठी/रेशीम उद्योगासाठी आवश्यक ------------घटकासाठी पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

**कृषि सहाय्यक**
**नाव**
**स्वाक्षरी**
**दिनांक**

(टीप-कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

**प्रपत्र - ३**

**पूर्वसंमती पत्र**

जा.क्र. -----------------

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, ____

उपविभाग _________,जिल्हा_________

दिनांक - / /२०

प्रति,

श्री/श्रीमती-----------------------------------------------------मु.पो.-----------------तालूका ----------------- जिल्हा ---------------

आपल्या दिनांक -------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे रेशीम उद्योगाच्या प्रस्तावास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. आपण सादर केलेल्या हमीपत्रात यापूर्वी______ या घटकासाठी______ लाभ घेतल्याचे नमूद केलेले आहे. सदरचे पूर्वसंमती पत्र दिल्याच्या तारखेपासून ४५ दिवसाच्या आत तुती लागवड करणे/ ग्राम कृषि संजीवनी मार्फत नियुक्त आवश्यक साहित्याची खरेदी समिती समवेत खरेदी करणे आवश्यक आहे. दिलेल्या मुदतीत लागवड/ खरेदी न केल्यास आपणास दिलेली पूर्वसंमती आपोआप रद्द समजण्यात यावी.सदर प्रकल्प उभारणीसाठी लाभार्थ्याने सर्व खर्च अगोदर करावयाचा आहे. लागवड/ खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अनुदान मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव १५ दिवसात सादर करावा. अनुदान मागणी प्रस्ताव मुदतीत सादर न केल्यास आपणास अनुदान मागणीचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रकल्प उभारणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपणास शासन निर्णयानुसार ( मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी ) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धते नूसार मंजूर करण्यात येईल.तसेच सदरचे अनुदान आपल्या बँकखात्यावर जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/ देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प / शासनाचा राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**

**उपविभाग _________**

**जिल्हा: _________**

**प्रत ,**

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित ,

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी------------

२) अध्यक्ष, ग्राम कृषी संजीवनी समिती-------------

## प्रपत्र - ४
## खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री/श्रीमती__________________________ मु.पो.______तालूका_______जिल्हा_______ यांनी रेशीम उद्योग या घटकांतर्गत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत या घटकासाठी विहित केलेल्या खरेदी समिती समक्ष मार्गदर्शक सूचनांना अनुसरून खरेदी केलेली आहे.

खरेदी केलेल्या रेशीम उद्योग साहित्याचा तपशिल -

| साहित्य तपशील | संख्या | किंमत रु. | खरेदीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |

**(स्वाक्षरी)** **लाभार्थी** (नाव )

**(स्वाक्षरी)** **खरेदी समिती सचिव** **(कृषि सहाय्यक)** (नाव )

**(स्वाक्षरी)** **उपस्थित खरेदी समिती सदस्य** (नाव )

दिनांक-

ठिकाण-

**(स्वाक्षरी)** **रेशीम संचालनालयाचा प्रतिनिधी/ सदस्य** (नाव )

**(स्वाक्षरी)** **कृषि मित्र/ कृषि ताई** (नाव )

**प्रपत्र - ५**

**(लाभार्थी अनुदान मागणी पत्र)**

**प्रती,**

उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग _________
जिल्हा: _________

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत देय अनुदान मिळणेबाबत.**

मी श्री./ श्रीमती_________________________ मु. _________ पो. _______ ता._______जि._________ आपणास मागणी करतो की, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या घटकांतर्गत मला मिळालेल्या मंजुरीनुसार _____हे. क्षेत्रावर तुती लागवड/रेशीम उद्योग दि. ________ रोजी खरेदी समिती सदस्यांच्या समक्ष खरेदी केलेले आहेत.

खरेदी साहित्याचा तपशील:

| अ.नं. | साहित्याचा तपशील | दर (रु.) | संख्या | एकूण किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

खरेदी केलेल्या रेशीम उद्योग साहित्याची तपशिलवार देयके सोबत जोडलेली आहेत, तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या घटकांतर्गत आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. ही विनंती

**दिनांक :**

**लाभार्थीची स्वाक्षरी/अंगठा**
**(नाव व पत्यासह)**

सोबत -

१. खरेदी देयकांच्या मूळप्रती
२. खरेदी समितीचे प्रमाणपत्र

## प्रपत्र - ६
## मोका तपासणी अहवाल
(कृषि सहाय्यक यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | | तपशील |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | | |
| २. | गावाचे नाव | | |
| ३. | तपासणी दिनांक | | |
| ४. | बाब | | रेशीम उद्योग |
| ५. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | | |
| ६. | तुती लागवड-पूर्व संमतीनुसार मंजूर क्षेत्र (हे.) | | |
| ७. | प्रत्यक्ष तुती लागवड क्षेत्र (हे.) | | |
| ८. | लागवड केलेल्या तुतीचे वाण | | |
| ९. | रेशीम उद्योग या बाबतचा तपशिल | साहित्याचा तपशिल<br>१<br>२<br>३<br>४ | दर संख्या एकुण किंमत अभिप्राय |
| १०. | रेशीम उद्योग या घटकासाठीची खरेदी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आहे काय ? | | होय/ नाही |
| ११. | सिंचनाची सोय आहे काय ? | | |
| १२. | अनुदानाची गणना : (तुती लागवड/रेशीम उद्योग साहित्याचा तपशिल, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>अ. १) तुती लागवडीचे क्षेत्र ___________हे.<br>२) मापदंडानुसार रक्कम (रु.)___________<br>३) देय अनुदान (रु.) ___________<br>४) शिफारस केलेली अनुदानाची रक्कम (रु.) ___________<br>ब. १) खरेदी केलेले साहित्य (रु.) _____________<br>२) मापदंडानुसार रक्कम (रु.)___________<br>३) देय अनुदान (रु.) ______________<br>४) शिफारस केलेली अनुदानाची रक्कम (रु.) ____________<br>एकूण देय अनुदान ________%<br>(सर्वसाधारण प्रवर्गासाठी खरेदी किमतीच्या ७५ % व अ.जाती / अ.जमाती ९० %) | | |

मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थीने तुती लागवड केलेली आहे. पुरवठा केलेले रेशीम उद्योग साहित्य प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील दिलेल्या निकषांप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी समिती समक्ष खरेदी केलेले आहे. इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी** **स्वाक्षरी कृषि सहाय्यक**

**(श्री. )** **( श्री. )**

**दिनांकीत स्वाक्षरी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

## प्रपत्र – ७
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>मु.पो. ___________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. _______ |
| ६. | बाब | रेशीम उद्योग |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | प्रत्यक्ष तुती लागवड क्षेत्र (हे.) | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | रेशीम उद्योग साहित्याचा तपशील–<br>दर संख्या एकूण किंमत अभिप्राय<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६. |
| ११. | देयकाची एकुण रक्कम (रु.) | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १५. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |

| | |
|---|---|
| १६. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय |
| | |
| १७. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव...................)